# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 03/02/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावर जावराबोडी शिवार येथे दिनांक 12/01/2021 चे 20:00 वा. दरम्यान आरोपी नामे– गुरूदेव जयाराम चहांदे, वय 35 वर्ष, रा. सावित्रीबाई फुले नगर नागपूर व अक्षय सागर रामटेके(मृतक), वय 27 वर्ष, रा. गोंडबोरी हे दोघेही एम.एच 49/बि.पी 2360 क्रमांकाच्या मोटरसायकलने डबल सिट भिवापुर ते गोंडबोरी जात होते. दरम्यान जावराबोडी शिवारात गुरूदेव जसाराम चहांदे याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्याचे गाडीचे नियंत्रण सुटले. या अपघातात अक्षय रामटेके याला डोक्याला मार लागल्याने त्यास उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता दि. 26/01/2021 रोजी उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजकुमार नारायन चाहांदे, वय 42 वर्षे, रा गोंडबोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि भस्मे हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 07 कि. मी. मौजा येरला येथे दिनांक 28/01/2021 चे 11.00 वा. दरम्यान सचिन बबन शेवाळे, वय 33 वर्ष, रा. येरला ता जि.नागपूर याची आई ही कपडे काढण्याकरिता घराच्या वरच्या माळयावर गेली असता सचिन शेवाळे याने अज्ञात कारणातुन त्याच्या राहत्या घरी वरच्या माळयावर विषारी औषध प्राशन करून मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बबन विठोबा शेवाळे, वय 60 वर्ष, रा. येरला यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ वानखेडे 9850492065 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर